# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION**

**मुख्य कार्यालय**

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ (२२६७ ०२१० /१४८ /२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ( 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

**माझगांव कार्यालय**

विक्रीकर भवन, ९ वा मजला,रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई ४००२०३ (२३७४२१९१ फॅक्स : २३७८१०६१

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balwantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 (23742191 Fax : 23781061

**ई-मेल sec.mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**


## महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (मुख्य) परीक्षा-२०११

### अधिसूचना क्रमांक : ३७४(२) दोन (२)/२०११/तीन

राज्य शासनाच्या सेवेतील खाली नमूद केलेल्या पदांवरील नियुक्तीकरिता आयोगामार्फत दिनांक १५ जानेवारी, २०१२ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (पूर्व) परीक्षा-२०११ मध्ये अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची मुख्य परीक्षा **दिनांक २८ व २९ एप्रिल,२०१२** रोजी **औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे** या ठिकाणी घेण्यात येईल. सदर परीक्षेसाठी **ऑनलाईन** पद्धतीने माहिती स्वीकारण्याचा **अंतिम दिनांक ११ एप्रिल, २०१२** हा आहे.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि. जा. (अ) | भ. ज. (ब) | वि. मा. प्र. | भ. ज. (क) | भ. ज. (ड) | इ. मा. व. |
| | **जलसंपदा विभाग** | | | | | | | | | |
| १ | **सहायक कार्यकारी अभियंता गट-अ (स्थापत्य) (एकूण पदे- २२)** | ११ | ३ | २ | १ | १ | १ | १ | -- | २ |
| | **महिला** | ३ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | **खेळाडू** | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | **अपंग** | श्रवण शक्तीतील दोष - १ | | | | | | | | |
| २ | **सहायक अभियंता, श्रेणी-१, गट-अ (स्थापत्य) (एकूण पदे- ५२)** | २६ | ७ | ४ | २ | १ | १ | २ | १ | ८ |
| | **महिला** | ८ | २ | १ | १ | -- | -- | १ | १ | २ |
| | **खेळाडू** | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | **अपंग** | श्रवण शक्तीतील दोष - १ चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - १ | | | | | | | | |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** महिला व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**२.३** महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग,क्रमांक ८२/२००१/म.से.आ.२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**२.४** खेळाडूंचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**२.५** अपंगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत.

**२.६** अपंगासाठी आरक्षित असलेल्या पदावर स्पर्धा परीक्षेद्वारे शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता गुणवत्ता क्रमानुसार त्याची शिफारस करण्यात येईल.

**२.७** अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि त्यांनी तसे आयोगास स्वतंत्ररित्या पत्राने कळविणे आवश्यक आहे.

**२.८** शासन निर्णय,न्यायाप्र-२००६/प्र.क्र.९/सुधार-३, दिनांक १३ ऑगस्ट, २००९ नुसार खालील अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी पात्र आहेत:- **(१)** अंधत्व किंवा क्षीण दृष्टी (blindness or low vision), **(२)** श्रवण शक्तीतील दोष (hearing impairment), **(३)**चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू (locomotor disability or cerebral palsy)

**३. मुख्य परीक्षेस प्रवेश :-**

**३.१** महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (पूर्व) परीक्षा-२०११ च्या निकाला आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि अधिसूचनेत नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अन्य अटीची पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या परीक्षेसाठी पात्र समजण्यात येईल.

**३.२** प्रस्तुत परीक्षा दोन टप्प्यात घेण्यात येईल.

**३.२.१** लेखी परीक्षा :- लेखी परीक्षेसाठी एकूण ७५० गुण राहतील.(यामध्ये वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाचा एक पेपर १५० गुणांचा व पारंपरिक स्वरूपाचे एकूण तीन पेपर प्रत्येकी २०० गुणांचे असतील.)

**३.२.२** मुलाखत :- मुलाखतीसाठी एकूण १०० गुण राहतील.

**४. वेतनश्रेणी** - रु. १५,६०० - ३९,१०० + ग्रेड पे रु. ५,४००/ , एकूण वित्तलब्धी अंदाजित रु. ४१,३८०/

**५. पात्रतेविषयक अटी :-**

**५.१** भारतीय नागरिकत्व.

**५.२ वय:-** उमेदवाराचे वय दिनांक १ मार्च, २०१२ रोजी किमान **१९ वर्षे** व कमाल **३३ वर्षे (मागासवर्गाकरिता ३८ वर्षे)** असावे. म्हणजेच उमेदवार दिनांक ०२/०३/१९९३ च्या पूर्वी आणि ०१/०३/१९७९ च्या नंतर जन्मलेला नसावा.

**५.३** शासन आदेशानुसार माजी सैनिक, अपंग व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

**५.४** शैक्षणिक अर्हता :-

**५.४.१** दोन्ही पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीच्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

**५.४.२** शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक:डीसीएस-१०८९/२१४८/का.सेवा -३,दिनांक २५ एप्रिल, १९९० व शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक जीटीआय/१०९८/१४५७९/(२३०/९८) तांशि- २, दि.१५ मार्च, १९९९ शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग : क्रमांक - न्यायप्र-१००५/(३०/०५) तांशि-२, दि.१८ जुलै, २००५ तसेच, इतर प्रचलित शासन निर्णयान्वये समकक्ष अर्हता धारण करीत असलेले उमेदवारही अर्ज करण्यास पात्र ठरतील.

**५.४.३** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**५.४.४** मुख्य परीक्षेची माहिती स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकांस म्हणजेच **दिनांक ११ एप्रिल,२०१२** अथवा त्यापूर्वी अर्हता धारण केलेली असणे आवश्यक.

**६.** प्रस्तुत अधिसूचनेमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. मुख्य परीक्षेकरीता माहिती स्वीकारण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" तसेच "**परीक्षा**" या विभागातील "**महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा, गट-अ** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

**७. शुल्क :** **७.१** अमागास – रुपये ४१०/- **७.२** मागासवर्गीय - रुपये २१०/-

**८. अर्ज करण्याची पद्धत :-**

**८.१** प्रस्तुत परीक्षेसाठी पात्र उमेदवारांना फक्त ऑनलाईन पद्धतीने माहिती सादर करता येईल. इतर कोणत्याही प्रकारे मुख्य परीक्षेच्या परीक्षेसंदर्भातील कार्यवाही करता येणार नाही.

**८.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) माहिती www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक २६/०३/२०१२ ते दिनांक ११/०४/२०१२** या कालावधित सादर करणे आवश्यक राहील.

**८.३** ऑनलाईन पद्धतीने माहिती सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.

**८.४** विहित पद्धतीने आयोगास माहिती सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**८.५** आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पध्दतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) क्रेडीट कार्ड (३) डेबिट कार्ड (४) नेटबँकिंग (५) कॅश कार्ड

**८.६** भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरल्यावर दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर (Working Days) उमेदवारांच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याचा एस. एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.

**८.७** विहित पध्दतीने माहिती सादर करुन परीक्षा शुल्क क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिंग अथवा कॅश कार्डद्वारे भरल्यानंतर उमेदवारांच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा (Payment received) एस. एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.

**८.८** दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर आयोगाकडून एस. एम.एस. प्राप्त न झाल्यास अथवा प्रोफाईद्वारे सूचना प्राप्त न झाल्यास ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या Feedback द्वारे Registration ID, Transaction ID व चलनावरील बँकेत रक्कम भरल्याचा दिनांक पाठवावा.

**८.९** प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**८.१०** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**९.** विहित पध्दतीने माहिती सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची अथवा क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिंग अथवा कॅश कार्डद्वारे रक्कम भरण्याची कार्यवाही दिनांक **११ एप्रिल,२०१२** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**१०.** चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक १२ एप्रिल, २०१२** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे.

मुंबई :

दिनांक : १९ मार्च, २०१२

**दी. प्र. मिरजकर**

उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**(१)आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारिरीक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.(२) मुलाखतीच्या वेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल.**